## Reading Passage

### आम्ही सहलीला जातो

गेला रविवार आम्ही अगदी मजेत घालवला. जेवणाचे डब्बे घेऊन सकाळी अगदी लवकर आम्ही शाळेत जमलो. आम्ही बसने निघालो. बुलढाण्याहून दोन तासात आम्ही लोणार तालुक्यात पोचलो. लोणारला पोचल्यावर आम्ही नाश्ता केला. तिथली माहिती सांगणारे गाईड आमची वाट पहात होते. ते म्हणाले, “मुलांनो, हजारो वर्षापूर्वी उल्कापातामुळे हे सरोवर तयार झालंय. हे खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. अशा प्रकारचे हे भारतातील एकमेव सरोवर आहे. सरोवराभोवती सुंदर हिरवळ आहे. काळ्या रंगाचा काठ आणि त्यात हिरव्या- निळ्या रंगाचं पाणी अगदी मोहक दिसत होतं. सरोवर एवढं मोठं होतं, की बाईंनी नी दुर्बीण आणली नसती, तर पलीकडची झाडं, पक्षी आम्हाला दिसले नसते. आम्ही खाऊ- फळं आणली होती; परंतु आम्ही तिथे कचरा टाकला नाही. आजूबाजूचा परिसर आम्ही स्वच्छ केला. बाईंनी आम्हाला शाबासकी दिली. आम्ही तिथे बराच वेळ खेळून परत निघालो. बसमध्ये आम्ही निसर्गाच्या किमयेची चर्चा करत होतो.

प्रश्न:

१. मुले सहलीला कुठे निघाली आहेत ?

२. सरोवर कश्यामुळे तयार झाले आहे?

३. सरोवरामध्ये कुठल्या रंगाचे पाणी आहे?

४. हे सरोवर कुठल्या तालुक्यात आहे?

५. बाईंनी लांबची झाडे पक्षी बघायला काय आणले होते?

## Reading Passage

# दुपारचा विरंगुळा

छे! मला फारच उकडत होतं. तिथल्या झाडांना असंच गरम आणि ओलसर वाटत असेल का? छे! या विचारांचा काही उपयोग नव्हता. घरात गरम, बाहेर गरम. करायला काहीच नव्हतं, अगदी कंटाळा आला होता. घराच्या समोर जिन्यावर थोडीशी सावली आली होती. तिथे मी बसले होते. पायरी सुद्धा अंगाला भाजत होती. पापण्या बंद करून मी सूर्याकडे बघत होते. माझ्या बंद डोळ्यासमोर रंगीत गोल, त्रिकोण तरंगत होते.

“काय करायचं?” मी विचार करत होते. तेवढ्यात मला अनिल दादाची खडूची पेटी दिसली. तो जिन्यावर ती विसरून गेला होता. एक पिवळा खडू घेऊन मी रस्त्यावर सूर्य रंगवला. त्याच्या बाजूला पांढऱ्या आणि पिवळ्या रंगाचे किरण रंगवले. तेवढ्यात तिथे अनिल दादा आला. “काय करते आहेस रमा?” त्याने विचारले. मी काहीच बोलले नाही. चित्राच्या खाली लिहिले - ”उष्णता”. अनिल दादाने त्याचा आवडता रंग घेतला- काळा. त्याने त्या काळया रंगाने एक मोठ्ठा चौकोन रंगवला. “ते काय आहे?” मी विचारले. “सावली” दादा म्हणाला.

प्रश्न:

१. रमा जिन्यावर का बसली आहे?

२. रमाने तिच्या चित्राला “उष्णता” असे नाव का दिले?

३. या गोष्टीचा निवेदक कोण आहे?

४. रमाच्या डोळ्यासमोर कुठले आकार तरंगत होते?

५. अनिल दादानी कोणत्या रंगाचा खडू घेऊन मोठ्ठा चौकोन रंगवला?

## Listening Passage

भारत देश म्हणजे पृथ्वीचा मुकुटमणी आहे. त्यामध्ये संपत्तीचे भांडार आहे. सगळे महत्वाचे धातू भारतात सापडतात. गंगा, यमुना, कृष्णा, कावेरी, आणि नर्मदा आपल्या अमृतजलाने त्याच्या भूमीचे सिंचन करतात. भारतभूमीच्या आकर्षणाने विदेशी लोक नेहमीच आकर्षित होतात. अनेक विदेशी लोकांनी येथे कोणत्या ना कोणत्या निमित्ताने येऊन ज्ञान आणि वैभव प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. अनेक महापुरुषांनी येथे जन्म घेतला. श्री रामा, श्री कृष्ण , गौतम बुद्‌ध, अर्जुन ही आदर्शाची उदाहरणे आहेत. नालंदा आणि तक्षशिला यासारखी विद्‌यापीठे होती. जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ वेद, उपनिषदे आणि भगवत गीता यांची निर्मिती भारतामध्ये झाली. व्यास, कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, तुलसीदास यांसारखे कवी भारतात जन्माला आले. .

प्रश्न

१. भारत देश कुणाचा मुकुटमणी आहे?

२. भारतामध्ये नैसर्गिक संपत्तीचे भांडार कोणते आहे?

३. भारतामध्ये कोणत्या महापुरुषांनी जन्म घेतला?

४. भारतातील कुठल्या नदया भूमी सिंचन करतात?

५. भारतात कोणती विद्‌यापीठे होती?

## Listening Passage

## डॉ. मार्टिन ल्यूथर किंग

डॉ. मार्टिन ल्यूथर किंग, हे पती होते आणि चार मुलांचे वडील होते. ते एक धर्मगुरू होते आणि एक लेखकही होते. ते दररोज अनेक लोकांशी बोलत असतं. तुरुगांतील लोकांशी बोलत. अमेरिकेच्या अध्यक्षांशी ते बोलत असत. डॉ किंग एकदा १९६३ साली वॉशिंग्टन डी. सी. इथे गेले होते. तिथे लिंकन मेमोरियलच्या पायऱ्यांवरून ते एका विशाल जनसमुदायाशी बोलले. सगळे लोक मनापासून ऐकत होते. डॉ. किंग त्यांच्या एका स्वप्नाबद्दल बोलत होते. ते म्हणाले, " माझे असे स्वप्न आहे की माझी चार मुले अश्या देशात राहतील की जिथे त्यांना त्यांच्या रंगावरून नाही तर त्यांच्या चारित्र्यावरून ओळखले जाईल."

लोकांना डॉ. किंग यांचे स्वप्न समजले. त्यांच्या लक्षात आले की सारी माणसे समान आहेत. त्यांना हेही कळले की आपले स्वप्न खरे करण्यासाठी डॉ किंग खूप काम करत आहेत. हळूहळू जग बदलू लागले. लोकांना डॉ किंग यांचे म्हणणे पटू लागले. ते त्यांच्याबरोबर काम करू लागले. डॉ. किंग यांच्यासमोर महात्मा गांधींचा आदर्श होता. गांधिन प्रमाणे त्यांनी अहिंसक मार्गाने वाईट कायद्याचा विरोध केला. लोकांना त्यांचे शब्द आठवले. त्यांच्या शब्दांनी अमेरिका बदलली.

प्रश्न:

१. ही गोष्ट कोणाबद्दल आहे?
२. डॉ. किंग यांचा व्यवसाय काय होता?
३. डॉ. किंग दररोज काय करीत असतं?
४. डॉ. किंग यांचे स्वप्न काय होते?
५. डॉ. किंग यांचे आदर्श कोण होते?